Fullerton India

# व्यक्तीगत/व्यावसायिक कर्जे

# कर्ज करारनामा

हा कर्ज करारनामा (''करारनामा'') ____________________ 2016 च्या ____________________, या दिवशी करण्यात आला ☒

द्वारा आणि दरम्यान

भाग एकचे कर्जदार, ज्यांचा तपशील या करारपत्राला जोडलेल्या कर्ज गोषवारा परिशिष्टात अधिक विशिष्टपणे वर्णन केलेला आहे, आणि जिथे कुठे संदर्भाची गरज असेल, यानंतर नाव लिहीलेला(ले) सह–कर्जदार आणि यानंतर पुढे संयुक्तपणे (जर एकापेक्षा अधिक कर्जदार असतील) ''कर्जदार'' (जी अभिव्यक्ती, संदर्भाला किंवा त्याच्या अर्थाला बाधक असल्याशिवाय, समाविष्ट आहे असे मानले जावे, जिथे कर्जदार एखादी व्यक्ती आहे, तिचे/त्याचे वारसदार, निष्पादक, प्रशासक जिथे कर्जदार एकादी एकमेव मालकीची संस्था आहे, ज्या व्यक्तीचे नाव एकमेव मालक म्हणून दिसते आणि त्यात त्याचे वारसदार, निष्पादक, प्रशासक आणि कायदेशीर प्रतिनिधी आणि परवानगी दिलेले अभिहस्तांकिती समाविष्ट असतील, कर्जदार भागीदारी संस्था आहे(आहेत), सदरहू भागीदारी संस्थेचे भागीदार, किंवा तात्पुरते भागीदार, त्यांच्यापैकी मागे राहणारे किंवा वारसदार, निष्पादक आणि बागीदारांचे प्रशासक, जिथे कर्जदार अविभक्त हिंदु कुटुंबाचा कर्ता आहे, सरहू अविभक्त हिंदु कुटुबांचे तात्पुरते सदस्य आणि त्यांचे संबंधित वारसदार, निष्पादक आणि प्रशासक आणि अभिहस्तांकिती, जिथे कर्जदार एक कंपनी आहे, तिचे उत्तराधिकारी आणि अभिहस्तांकिती, जिथे कर्जदार अंगीकृत न केलेली संस्था आहे, अशा संस्थेचे सर्व सदस्य आणि त्यांचे संबंधित उत्तराधिकारी, जिथे कर्जदार एखादी सोसायटी आहे, शासकीय संस्ता आणि शासकीय संस्थेच्या सदस्यांचे संबंधित उत्तराधिकारी आणि कोणतेही निवडलेले, नियुक्त केलेले किंवा स्वीकृत केलेले नवीन सदस्य, जिथे कर्जदार एखादी विश्वस्त न्यास आहे, न्यासाचे विश्वस्त आणि उत्तराधिकारी आणि जिथे कर्जदार मर्यादित दायित्व भागीदारी आहे, सदरहू मर्यादित दायित्व भागीदारीचे भागीदार किंवा तात्पुरते भागीदार आणि भागीदारांचे वारसदार, निष्पादक आणि प्रशासक आणि फर्मच्या अभिहस्तांकितीचे उत्तराधिकारी.

आणि

अन्य भागाची फुलेर्टोन इंडिया क्रेडीट कंपनी लिमिटेड, कंपन्या अधिनियम 1956 अधीन नोंदणीकृत असलेली, मेघ टॉवर्स, 3रा मजला, जुना क्र. 307, नवीन क्र. 165, पुनामल्ली हाय रोड, मदुरावोयाल, चेन्नई– 600095, तामीलनाडू येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली आणि इतर बाबींबरोबरच, या ठिकाणी सोबत जोडलेल्या लेन समरी शेड्यूलमध्ये दिलेल्या पत्त्यावर शाखा कार्यालय असलेली कंपनी (आणि यानंतर पुढे ''एफआयसीसीएल'' म्हणून संदर्भित केलेली, ज्या अभिव्यक्तीत, संदर्भाला बाधक असल्याशिवाय, तिचे उत्तराधिकारी आणि अभिहस्तांकिती समाविष्ट असल्याचे मानले जाईल).

कोणत्याही लिगाच्या संदर्भात सर्व लिंगांचा आणि एकवचनी संख्येच्या संदर्भात अनेकवचनी संख्यांचा समावेश असेल आणि त्या संदर्भात त्याचप्रमाणे उलट असेल. करार शब्दाचा अर्थ असेल आणि त्यात समाविष्ट असेल हा कर्ज करार, लोन समरी शेड्यूल्स, याठिकाणी जोडलेले आकारांचे पत्रक आणि कोणतीही सप्लीमेंटल शेड्यूल्स, परतफेडीची शेड्यूल्स, आता आणि यानंतर जोडलेली परिशिष्टे या कराराचा भाग बनणारी म्हणून आणि कोणतेही परिशिष्ट, निशाणी आणि या कराराला आता जोडलेली आणि यानंतर वेळोवेळी जोडलेली अन्य पूरकपत्रे.

ज्याअर्थी कर्जदाराने एफआयसीसीएलला पेशा/व्यक्तीगत/व्यावसायिक गरजांसाठी एका कर्जासाठी विनंती केली आहे आणि कर्जदाराच्या विनंतीवरून एपआयसीसीएलने यात दिसून येणार्या परस्परसंमत अटी आणि शर्तींवर कर्ज (यानंतर पुढे निश्चीत केल्याप्रमाणे) मंजूर करण्याचे मान्य केले आहे.

आता याद्वारे यातील दोन्ही पक्षांच्या दरम्यान खालीलप्रमाणे सहमती झाली आहेः–

1. कर्ज, वाटप, व्याज आणि परतफेड

1.1 यात असलेल्या अटी आणि शर्तींच्या अधीन, कर्जदार एफआयसीसीएलकडून कर्ज घेण्याचे आणि एफआयसीसीएल कर्जदारा(रां)ना याच्या लोन समरी शेड्यूलमध्ये विनिर्दिष्टीत केलेल्या रकमेचे(ज्या रकमेला यानंतर पुढे ''कर्ज'' म्हणूनसंदर्भित करण्यात आले आहे) देण्याचे मान्य करते. कर्जाचे वाटप पूर्णपणे किंवा हप्त्यांमद्ये किंवा एफआयसीसीएल ठरवू शकेल अशा अन्य पद्धतीने केले जाऊ शकेल. कर्जाचे वाटप कर्जदाराने नियुक्त केलेल्या दुसऱ्या व्यक्तीला/व्यक्तींना केले जाईल जर, एफआयसीसीएलद्वारे कोणतेही कर्जाचे वाटप पूर्वोक्त नियुक्त व्यक्तीला/व्यक्तींना करण्यात आले तर त्याचा परिणाम कर्जाच्या संबंदात कर्जदाराच्या कर्तव्यावर होणार नाही आणि असे नियुक्त व्यक्तीला/व्यक्तींना कजाचे वाटप कर्जदाराला केल्याचे आणि त्याने घेतल्याचे मानले जाईल.

**1.2** कर्जदार लोन समरी शेड्यूलमध्ये विनिर्दिष्टीत केलेल्या दराने कर्जाच्या रकमेवर व्याज प्रदान करेल. कर्जावरील व्याजाचे गणन थकित मुदलाच्या रकमेवर मासिक अंतराने रोज तत्त्वावर केले जाईल. कर्जावरील व्याजाचे अर्जन, निर्गम, वाटचाल, संकलन, धनादेशाची रक्कम वसूल होणे यासाठी लागलेल्या वेळाचा आणि/किंवा आणि कर्जदार किंवा त्याच्या बँकेद्वारे इतर कोणत्याही कारणाचा विचार न करता, कराराच्या तारखेपासून सुरू होईल.

**1.3** कर्जदार कर्जाची परतफेड/प्रदान देय तारखेला व्याजासमवेत मासिक हप्त्यांमध्ये आणि लोन समरी शेड्यूलमध्ये विनिर्दिष्टीत केलेल्या पद्धतीने करेल.

**1.4** कर्जदाराने लोन समरी शेड्यूल, आकारांचे पत्रक आणि एफआयसीसीएलच्या वेबसाइट (http://www.fullertonindia.com/about-us/loan-charges.aspx), मध्ये विनिर्दिष्टीत केलेली शुल्के आणि आकार उचलायचे आहेत आणि एफआयसीसीएलला प्रदान करायचे आहेत आणि ज्यात डॉक्युमेंटेशन आणि प्रोसेसिंग शुल्क (ना–परतावायोग्य), प्री–इएमआय व्याज, (लागू असल्यास), आणि धनादेश बाउन्स झाल्याबद्दलचा आकार, धनादेशइसीएस स्वॅप आकार, अतिरिक्त व्याज, प्रीपेमेंट/फोरक्लोजर आकार, आणि एफआयसीसीएलच्या अंतर्गत धोरणानुसार वेळोवेळी लागू असणारे कोणतेही आकार आणि शुल्के, कर्जाच्या संबंधात देय असलेले वैधानिक किंवा अन्यथा आकार यांचा समावेश असेल पण तीच मर्यादा नाही. एफआयसीसीएल कर्जदाराला कोणतीही सूचना दिल्याशिवाय उक्त शुल्केआकार यांत सुधारणा करण्यास पात्र आहे. उक्त आकारांच्या व्यतिरिक्त कर्जदार व्याज कर, सेवा कर, शुल्के (मुद्रांक शुल्कासह), कर (सरकार किंवा अन्य प्राधीकरणाद्वारे वेळोवेळी लागू करण्यात येणारे कोणत्याही वर्णनाचे)आणि (अ) कर्जासाठी अर्ज आणि मंजूरी आणि परतफेड(ब) व्याजासह कर्जाची वसूली आणि रिअलायजेशन, (क) एन्फोर्समेंट प्रोसिडींग्स, काही असल्यास, च्या संबंधातील सर्व किंमती आणि खर्च जो काही असेल तो उचलेल, एफआयसीसीएलला प्रदान करेल, प्रतीपूर्ती करेल.

**1.5** कर्जदाराने कर्जाच्या अधीन अएफआयसीसीएलला देय असलेल्या रकमांच्या पेक्षा अधिक कोणतीही रक्कम वित्तप्रेषित केल्याच्या प्रसंगात, अशा अधिकांश रकमांच्या परताव्यासाठी वेळोवेळी एफआयसीसीएल ठरवेल त्याप्रमाणे प्राससेसिंग शुल्क आकारण्याचा अधिकार एफआयसीसीएल राखून ठेवते.

**1.6** प्री–इएमआय व्याज, अग्रिम हप्ता, विमा प्रिमियम, डॉक्युमेंटेशन आकार, ट्रँझॅक्शन/प्रोसेसिंग आकार, आणि/किंवा कर्जाखालील किंवा त्याच्याशी संबंधित कोणतेही इतर आकार कर्जातून कापून घेतले जातील आणि अशा शुल्कांच्या आणि/किंवा आकारांच्या कपातीनंतरची कर्जाची नक्त रकमेचे कर्जदाराला वाटप करण्यात येईल.

**1.7** कर्ज मागणी केल्यावर ताबडतोब परतफेड करण्यायोग्य असेल आणि त्यानुसार, कर्जासाठी परतफेडीच्या अनुसूचीचा विचार न करता, एफआयसीसीएलला कर्जाच्या संबंधातील व्याजासहित इतर सर्व देयांबरोबर कर्जाखाली थकित असलेली संपूर्ण रक्कम मागणी केल्यावर प्रदान करून घेण्याचा हक्क असेल.

**1.8** कर्जदार कर्जाच्या परतफेडीसाठी पोस्ट–डेटेड चेकस् (पीडीसी)/इसीएस देण्याचे मान्य करतो. कर्जदार पोच देतो की परतफेडीची इसीएस पद्धत एफआयसीसीएलच्या नावे दिलेल्या पीडीसीच्या वर आणि बाहेर आहे.

**1.9** कर्जदार पुष्टी करतो की तो कर्जाचा वापर (किंवा त्याचा कोणताही हिस्सा) अर्ज प्रपत्रात विनिर्दिष्टीत केलेल्या हेतूव्यतिरिक्त अन्य हेतूंसाठी, किंवा कोणत्याही हवाला, अयोग्य, बेकायदेशीर किंवा कायदाबाह्य हेतूंसाठी/कृतींसाठी करणार नाही.

**1.10** याद्वारे मान्य करण्यात येते की दोन किंवा अधिक कर्जदारांच्या बाबतीत कर्जदारांचे कर्जाची परतफेड करण्याचे आणि या करारनाम्याखालील कर्तव्यांची पूर्तता करण्याचे दायित्व संयुक्त, आणि पृथक आणि सह–विस्तारित असेल.

**1.11** या करारनाम्याखाली किंवा त्याच्या अनुषंगाने कर्जदारांकडून एफआयसीसीएलला करण्यात येणारी सर्व प्रदाने मुक्त कोणत्याही कपातीशिवाय किंवा कर कपातीपोटीसाठी कपातीपासून मुक्त आणि स्वच्छ करण्यात येतील जेणेकरून एफआयसीसीएलला अशी कपात केली नसता किंवा करणे आवश्यक नसताना जी रक्कम मिळाली असती त्याच्या सममूल्य रक्कम मिळेल (अशा कपातीसाठी कोणत्याही दायित्वाशिवाय). सेवा कर आणि इतर सर्व लागू असणारे कर किंवा अन्य वैधानिक शुल्के, काही असल्यास, कर्जदाराला आकारली जातील आणि ती त्यांनी प्रदान करायची आहेत.

**1.12** याखालील इएमआयच्या प्रदानाता कर्जदाराने कसूर करण्याच्या प्रसंगात, कर्जदार अशा कसूरीच्या तारखेला कर्जाखाली थकित असलेल्या मुदलाच्या रकमेवर, लोन समरी शेड्यूलमध्ये विनिर्दिष्टीत केलेल्या दराने, मासिक अंतराने किंवा एफआयसीसीएल वेळोवेळी लेखी अधिसूचीत करू शकेल अशा अंतराने, कसूरीच्या तारखेपासून सर्व देय रकमांचे प्रदान होण्याच्या तारखेपर्यंत अतिरिक्त व्याज प्रदान करेल. अतिरिक्त व्याजाचे प्रदान कर्जदाराला या करारनाम्याखालील कर्तव्यापासून मुक्त करणार नाही. इथे वर दिलेले काहीही विचारात न घेता, एफआयसीसीएल अभिव्यक्तपणे कर्जदाराने कसूर करण्यामुळे उपार्जित होऊ शकणारे सर्व हक्क राखून ठेवते. अतिरिक्त व्याज हे कर्जदार कर्जाच्या अटीनुसार एफआयसीसीएलला देय होत असलेल्या कोणत्याही इतर आकारांच्या व्यतिरिक्त आहेत.

**1.13** कर्जदार कोणत्याही वेळी एफआयसीसीएलला 21 दिवसांची पूर्वसूचना देऊन संपूर्ण कर्जाची, त्यावरील थकित असलल्या व्याजासह मुदतपूर्व परतफेड करू शकेल. कर्जदाराने मुदतपूर्व परतफेडीच्या त्याच्या हक्काचा वापर करण्याच्या प्रसंगात, एफआयसीसीएल लोन समरी शेड्यूलमध्ये विनिर्दिष्टीत केलेल्या दराने प्रीपेमेंट शुल्क/आकार आकारण्यास पात्र असेल.

**1.14** कर्जदार हप्ते अग्रिम प्रदान करण्यास पात्र असेल, तथापि, एफआयसीसीएल अग्रिम प्रदान केलेल्या हप्त्यांवर कोणतेही वज देण्यास बांधील नसेल.

**1.15** कर्जदार याद्वारे मान्य करतो आणि पुष्टी करतो की कर्जदाराने कर्जाच्या अनुषंगाने अर्ज करण्याच्या आणि/किंवा डॉक्युमेंटेशनच्या वेळी कर्जाच्या संबंधात स्रोतीकरण, पडताळणी आणि कायदेशीर खर्चासह पण त्याच मर्यादित नाही, धनकोने केलेला किंवा करावयाच्या एक वेळच्या किंमतीपोटी आणि/किंवा खर्चापोटी धनकोला प्रदान केलेल्या सर्व आकारांची शुल्कांची वगैरे त्याला/तिला माहिती आहे आणि तो/ती त्याचा स्वीकार करतो/ते.

**1.16** या कलम क्र. 1 किंवा या करारनाम्याच्या कोणत्याही अन्य कलमाखाली देय असलेले कोणतेही आकार एफआयसीसीएलद्वारे तिच्या एकट्याच्या स्वेच्छानिर्णयाने सोडून दिले जाऊ शकतील आणि एफआयसीसीएलचा निर्णय अंतिम आणि कर्जदाराद्वारे कोणत्याही अवलंबाशिवाय असेल.

2. कसूरीचा प्रसंग आणि कसूरीचे परिणाम

**2.1** कसूरीची घटना घडल्याचे मानले जाईल जरः (ए)कर्जदाराने या करारनाम्यातील कोणत्याही अटी आणि शर्तींचे उल्लंघन केले, किंवा (बी) कर्जदार देय तारखेला किंवा आधी कोणताही हप्ता किंवा कोणतेही अन्य प्रदान करण्यात अयशस्वी ठरला, किंवा (सी) कर्जदाराने एफआयसीसीएल किंवा इतर कोणत्याही बँकेबरोबरच्या किंवा वित्तीय संस्थेबरोबरच्या करारनाम्याखाली कोणतीही कसूर केली, किंवा (डी) कर्जदाराने एफआयसीसीएलला कोणतीही चुकीची माहिती दिल्याचे आढळून आले, किंवा (इ) कर्जदाराने नादारीची कोणतीही कृती केली किंवा कर्जदाराला नादार किंवा दिवाळखोर घोषित करण्यात आले किंवा कर्जदाराच्या कोणत्याही मलमत्तेच्या किंवा वतनाच्या संबंधात परिसमापकाची किंवा रिसीवरची नियुक्ती करण्यात आली किंवा कर्जदाराने स्वतःला नादार घोषित करण्यासाठी कोणताही अर्ज केला किंवा कर्जदाराला नादार घोषित करण्यासाठी कोणताही अर्ज करण्यात आला किंवा सक्षम न्यायालयाने किंवा प्राधीकरणाने कर्जदाराला नादारीत घेण्यासाठी कोणताही आदेश पारित केला, किंवा (एफ) कर्जदार किंवा कर्जदाराच्या कोणत्याही भागीदाराने घोषित केलेला पेशा/व्यवसाय करणे बंद केले, किंवा (जी) कर्जदाराच्या स्थितीत किंवा घटनेत कोणताही बदल झाला आणि असा बदल एफआयसीसीएलने भौतिक बदल मानला, किंवा (एच) अशी कोणतीही परिस्थिती अस्तित्वात असली जी एफआयसीसीएलच्या मते एफआयसीसीएलच्या हितसंबंधांवर किंवा कर्जदाराच्या कर्जाच्या परतफेडीच्या क्षमतेवर बाधक रितीने परिणाम करेल.

**2.2** कसूरीची कोणतीही घटना घडल्यावर आणि त्यानंतर कोणत्याही वेळी, एफआयसीसीएल थकित कर्जाची रक्कम ताबडतोब आदेय आणि देय असल्याचे घोषित करण्यास पात्र असेल आणि त्यानंतर कर्जदार कोणत्याही पुढील सूचनेशिवाय किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर औपचारिकतांशिवाय कर्जाखालील/करारनाम्याखालील आदेय आणि देय असलेल्या सर्व रकमा अटी आणि शर्तीनुसार प्रदान करेल. कर्जदार ठरवून दिलेल्या वेळेत सदरहू प्रदाने न करू शकल्यास, एफआयसीसीएल तिच्या एकट्याच्या स्वेच्छानिर्णयाने लागू असलेल्या कायद्यांखाली तिला उपलब्ध असू शकेल असा कोणताही हक्क किंवा उपाय अंमलात आणेल.

---

कर्जदार ☒ सह–कर्जदार ☒ एफआयसीसीएल करिता अधिकृत स्वाक्षरीकर्ता

3. इतर अटी आणि शर्ती

**3.1** एफआयसीसीएलला एफआयसीसीएलच्या नियंत्रणातील कर्जदाराच्या मत्तांवर धारणाधिकार असेल आणि कर्जदाराला एफआयसीसीएलकडून देय असलेल्या कोणत्याही पैशांसमक्ष वजावट करण्याचा आणि एफआयसीसीएलची देणी वसूल करण्यासाठी कर्जदाराची सर्व खाती एकत्र करण्याचा हक्क असेल.

**3.2** एफआयसीसीएल सर्वकाळ आणि कोणत्याही कर्जदाराला सूचनेशिवाय कर्जदाराच्या नावे जमा असलेल्या किंवा त्याच्या मालकीच्या असलेल्या एफआयसीसीएलच्या हातातील पैसे वजावट किंवा लागू करण्याचा किंवा एफआयसीसीएलला देय असलेल्या कोणत्याही वेळी पुढील रकमेच्या प्रदानापोटी किंवा सदरहू कर्जाच्या थकित रकमेपोटी किंवा पूर्वोक्त अन्यथाप्रमाणे आणि सदरहू कर्जाखालील एफआयसीसीएलला देय असलेल्या राहिलेल्या शिलकीच्या वसूलीसाठी किंवा अन्यथा सिक्युरिटीपैकी सर्व किंवा कोणतीही थकित असू शकेल किंवा वसूल झाली नसू शकेल अशी दाव्याद्वारे किंवा अन्यथा कर्जदाराकडून वसूल करण्याचा हक्क असेल.

**3.3** कर्जदार त्याचे करारनामा आणि/किंवा कर्जाखालील सर्व किंवा कोणतेही हक्क, लाभ किंवा कर्तव्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे अभिहस्तांकित करणार नाही किंवा हस्तांतरित करणार नाही. एफआयसीसीएल कोणत्याही संमतीशिवाय किंवा कर्जदाराला संदर्भित केल्याशिवाय या करारनाम्याखालील तिचे सर्व किंवा कोणतेही हक्क, लाभ आणि कर्तव्ये कोणत्याही व्यक्तीला पूर्णपणे किंवा अंशतः आणि अशा पद्धतीने आणि एफआयसीसीएल ठरवू शकेल अशा अटी आणि शर्तींवर विकण्यास, अभिहस्तांकित करण्यास, प्रतीभूत करण्यास, नोव्हेट किंवा हस्तांतरित करण्यास पात्र असेल. अशी कोणतीही विक्री, अभिहस्तांकन किंवा हस्तांतरण निर्णायकपणे कर्जदारावर बंधनकारक असेल.

**3.4** कर्जदार अभिव्यक्तपणे मान्य करतो आणि स्वीकारतो की एफआयसीसीएलला कर्जदाराने सादर केलेल्या कोणत्याही वस्तुस्थितीचा किंवा माहितीची पडताळणी करण्यासाठी एफआयसीसीएलच्या पसंतीच्या एक किंवा अधिक तृतीय पक्षांची नियुक्ती करण्याचा आणि अशा तृतीय पक्षांकडे एफआयसीसीएलला देय असलेल्या रकमा वसूल/प्राप्त करण्याच्या दृष्टीने एफआयसीसीएलला आवश्यक असल्याप्रमाणे सर्व कृती/पावले उचलण्यासाठी किंवा कर्जाखाली प्रदान न केलेल्या सर्व रकमा संकलित करण्यासाठी, कर्जदाराच्या कार्यालयात किंवा निवासस्थानी हजर राहण्यासाठी, देय रकमा प्राप्त करण्यासाठी, आणि सर्वसाधारणपणे तृतीय पक्ष अशा हेतूंसाटी उचित समजेल अशा सर्व कृती करण्यासाठी हक्क आणि अधिकार हस्तांतरित करण्याचा किंवा सुपूर्द करण्याचा हक्क आणि अधिकार असेल.

**3.5** कर्जदाराला दिलेल्या/मंजूर केलेल्या/मंजूर करावयाच्या कर्जासाठी पूर्वअट म्हणून, एफआयसीसीएलला कर्जदाराच्या संबंधातील सर्व माहिती आणि तपशील , कर्जदाराने लाभ घेतलेल्या कोणत्याही क्रेडीट सुविधेची माहिती आणि डेटा आणि/किंवा कर्जदाराने कर्जदाराच्या कर्तव्याचे पालन करण्यात कोणतीही कसूर केली असल्यास त्याच्या संबंधातील माहिती आणि डेटा आणि/किंवा एफआयसीसीएलला योग्य वाटेल त्याप्रमाणे एफआयसीसीचे ज्यांच्याबरोबर टायअप आहेत किंवा भविष्यात केले जातील अशा बँका वित्तीय संस्था, क्रेडीट इन्फर्मेशन ब्युरो (इंडिया) लिमिटेड आणिकिंवा इतर क्रेडीट ब्युरोज् एजन्सीज्, वैधानिक संस्था अशा कोणत्याही व्यावसायिक एखकांच्या कर्जाच्या परतपेडीचा इतिहास यांची देवाणघेवाण, वाटून घेणे, उघड करणे किंवा देऊन टाकणे यासाठी संमती देतो, मान्य करतो आणि एफआयसीसएलला अधिकार देतो. कर्जदार पोच देतो की अशा प्रकारे अधिकार दिलेले क्रेडीट ब्युरोज् किंवा अन्य एजन्सीज् त्यांना योग्य वाटेल अशा पद्धतीने एफआयसीसीएलद्वारे उघड केलेली माहिती आणि डेटा यांचा वापर करू शकतील आणि त्यावर प्रक्रिया करू शकतील. त्यापुढे, कर्जदार क्रेडीट ब्युरोज्ना प्रक्रिया केलेली माहिती आणि डेटा किंवा त्यावतीने भारतीय रिझर्व बँकेने विनिर्दिष्टीत केले असू शकेल अशा बँका/वित्तीय संस्था आणि/किंवा इतर क्रेडीट ग्रँटर्स किंवा नोंदणीकृत वापरकर्ते यांनी तयार केलेली प्रॉडक्ट विचारार्थ सादर करण्याची परवानगी देतो आणि पुष्टी करतो.

**3.6** कर्जदार याद्वारे एफआयसीसएल, तिचे अधिकारी आणि एजन्टस् यांना कर्जदाराच्या आणि कर्जदाराच्या कर्ज खात्याशी संबंधित माहिती आणिकिंवा कोणत्याही सुविधा, घेतलेली कोणतीही सुक्युरिटी, हाती घेतलेले व्यवहार आणि एफआयसीसीएलबरोबर शिलकीची स्थिती यांचा तपशील पण त्याच मर्यादित नाही, समावेशासह एफआयसीसीएलशी संबंध ठेवणे यांचा तपशील खालीलना उघड करण्याची संमती देतोः

(I) पेशेवर सल्लागार एफआयसीसीएलचे सेवा पुरवठादार

(ii) कोणताही प्रत्यक्ष किंवा संभाव्य अभिहस्तांकिती, नोव्हाटी, हस्तांतरक, सहभागी किंवा उप सहभागी यांना कोणत्याही करारनाम्याखालील एफआयसीसीएलच्या कोणत्याही हक्काच्या किंवा कर्तव्याच्या संबंधात

(iii) कोणतीही श्रेणीकरण एजन्सी, विमाकर्ता किंवा एफआयसीसीएलद्वारे पुरविल्या जाणाऱ्या किंवा पुरविण्यात येणाऱ्या सेवाच्या संबंधातील हेतूंसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष क्रेडीट संरक्षणाचा किंवा आर्थिक पाठबळाचा पुरवठादार.

4. लवाद

**4.1** या करारनाम्याच्या उद्भवणाऱ्या सर्व विवादांची, मतभेदांची आणि/किंवा दाव्यांची तडजोड आर्बिट्रेशन अँड कन्सिलिएशन अधिनियम, 1996 च्या तरतूदीनुसार किंवा त्यातील कोणत्याही वैधानिक सुधारणांनुसार केली जाईल आणि ती एफआयसीसीएलद्वारे नियुक्त करण्यात/नामनिर्देशित केल्या जाणाऱ्या एकमेव लवादाद्वारे लवादाद्वारे संदर्भित केली जाईल. लवाद म्हणून काम करण्यासाठी अशा प्रकारे नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या मृत्यूच्या, नकाराच्या, दुर्लक्षाच्या किंवा असमर्थतेच्या प्रसंगात एफआयसीसीलवाद म्हणून काम करण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती करू शकेल. अंतरिम निवाड्यासहित लवादाचे निर्णय अंतिम असतील आणि सर्व सबंधित पक्षांवर बंधनकारक असतील. लवाद वेळोवेळी लवादाची कारवाई करण्यासाठी कार्यपद्धती ठरवून देऊ शकेल आणि लवादाची कारवाई त्याला उचित वाटेल अशा पद्धतीने करू शकेल. लवादाची कारवाई लोन समरी शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या ठिकाणी केली जाईल. यात असलेल्या लवादाच्या कलमाच्या अधीन, लोन समरी शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या ठिकाणच्या सक्षम न्यायालयांना या करारनाम्यातून किंवा त्याच्या संबंधात उद्भवणाऱ्या कोणत्याही विषयात विशेष अधिकारिता असेल. तथापि, यामुळे धनकोच्या कोणत्याही इतर न्यायालयात किंवा सक्षम अधिकारितेच्या न्यायाधिकरणाकडे कारवाई दाखल करण्यावर/नेण्यावर मर्यादा येणार नाहीत.

5. संकीर्ण

**5.1** या करारनाम्याची कोणतीही अट किंवा तरतूद सक्षम अधिकारितेच्या कोणत्याही न्यायालयाने अवैध घोषित केली तर, या करारनाम्याच्या इतर अटी आणि शर्ती अबाधित राहतील आणि पूर्णपणे लागू आणि प्रभावी राहतील.

**5.2** कर्जदार घोषित करतो की अर्ज प्रपत्रात दिलेली सर्व माहिती आणि तपशील आणि अर्जाबरोबर सादर केलेली सर्व कागदपत्रे सत्य, बरोबर, संपूर्ण आणि सर्व प्रकारे अद्ययावत आहेत आणि कर्जाच्या मंजूरीच्या निर्णयावर परिणाम होऊ शकेल असा कोणताही भौतिक तपशील लपवलेला नाही.

**5.3** हा करारनामा आणि याविषयाच्या अनुषंगाने निष्पादित करायची कागदपत्रे निष्पादित करणारे कर्जदाराचे अधिकारी यथायोग्यप्रकारे आणि उचितपणे कार्यालयात असावेत आणि त्यांना ते निष्पादित करण्याचा अधिकार असावा.

**5.4** असे की कर्जदाराला हा करारनामा निष्पादित, डिलीवरी आणि कामगिरी करण्याचा शक्ती, क्षमता आणि अधिकार असावा आणि त्यांनी या करारनाम्याच्या अधिकारसाठी, निष्पादनासाठी, डिलीवरीसाठी आणि कामगिरीसाठी आवश्यक ती कारवाई (कॉर्पोरेट, वैधानिक किंवा अन्यथा) केलेली असावी.

**5.5** या करारनाम्याखालील कर्जदाराचे कोणतेही उल्लंघन किंवा कसूरीमुळे एफआयसीसीएलला उपार्जित होणाऱ्या कोणत्याही हक्काच्या, शक्तीच्या किंवा उपायांच्या वापरातील दिरंगाई किंवा भूल, एफआयसीसीएलच्या अशा हक्काला, शक्तीला किंवा उपायाला दुर्बल करणार नाही किंवा ते अशा कोणत्याही उल्लंघनाला किंवा कसूरीला किंवा त्यातील मूकसंमती सोडून दिल्याचे समजले जाणार नाही किंवा कोणतेही एक उल्घन किंवा कसूर सोडून देणे कोणतीही इतर उल्लंघन किंवा कसूरी सोडून देण्यात आल्याचे मानले जाणार नाही. करारनाम्यात एफआयसीसीएलला पुरविण्यात आलेले हक्क आणि उपाय एकत्रित आणि कायद्याने पुरविण्यात आलेल्या कोणत्याही हक्कांच्या आणि उपाय वगळून आहेत.

**5.6** बँकेत न भरलेले धनादेश नष्ट करणेः कर्जदाराचे कर्जाच्या संबंधात एफआयसीसएलच्या नावे देण्यात आलेले बँकेत न भरलेले न वापरलेले आणि सध्या एफआयसीसीएलच्या ताब्यात असलेले धनादेश कर्ज मुदतपूर्तीच्या किंवा कर्जाच्या मुदतपूर्व परतफेडीच्या मार्गाने आणि/किंवा अन्यथा बंद केल्यानंतर कोणत्याही सूचनेशिवाय ताबडतोब नष्ट केले जातील.

**5.7** एफआयसीसीएलद्वारे कर्जदाराला पाठवणे आवश्यक असलेली कोणतीही सूचना/पत्र लोन समरी शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी पाठविले जाईल. एफआयसीसीएलद्वारे कर्जदाराला पाठवायची कोणतीही सूचना लोन समरी शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या शाखेच्या पत्त्यावर रजिस्टर्ड/ प्रीपेड पोस्टद्वारे पाठवली जाईल. कर्जदार पत्त्यातील कोणताही बदल बदलापासून एक आठवड्याच्या आत एफआयसीसीएलला लेखी अधिसूचित करेल.

कर्जदार ☒ सह–कर्जदार ☒ एफआयसीसीएल करिता अधिकृत स्वाक्षरीकर्ता

**5.8** या करारनाम्याला जोडलेले लोन समरी शेड्यूल या करारनाम्याचा अविबाज्य भाग बनेल, त्यासंबंधात जशा तरतूदी यात निश्चीत करण्यात आल्या आहेत त्याप्रमाणे.

**5.9** कर्जदार पोच देतो की करारनाम्यातील तपशील कर्जदाराच्या उपस्थितीत भरण्यात आला आहे आणि त्याने कर्जाच्या सर्व अटी आणि शर्ती वाचल्या आहेत आणि समजून घेतल्या आहेत. कर्जदार याचीही पोच देतो की करारनाम्याच्या पूर्वोक्त अटी आणि शर्ती आणि इतर कागदपत्रे कर्जदाराला कर्जदाराला समजणाऱ्या भाषेत स्पष्ट करून सांगण्यात आली आहेत आणि कर्जदाराला अटी आणि शर्तींचा संपूर्ण अर्थ समजला आहे आणि त्याने या करारातील विषय समजून घेतल्यानंतर आणि पडताळणी केल्यानंतर त्याची/तिची सही केली आहे.

**5.10** अधिभावी परिणामः हा करारनामा आणि याला जोडलेली किंवा इथे खाली संदर्भित केलेली कोणतीही इतर कागदपत्रे यात नमूद केलेल्या किंवा याच्याशी प्रसंगानुरुप असणाऱ्या सर्व अटी आणि शर्ती एकात्मिक करतात आणि यातील विषयाच्या मजकूराच्या संबंधातील सर्व तोंडी वाटाघाटी आणि पूर्वीची लिखाणे, या करारनाम्याच्या पूर्वी देण्यात आलेल्या मंजूरी पत्राच्या तरतूदी, ज्या यांच्या व्यतिरिक्त आणि पूरक आहेत, आणि या करारनाम्याच्या अटींप्रमाणे किंवा त्यांच्याशी संघर्ष होणाऱ्या नाहीत त्यांचा अपवाद करता, यांची जागा घेतात. या करारनाम्याच्या आणि यात जोडलेल्या किंवा यात संदर्भित केलेल्या कोणत्याही कागदपत्रांच्या आणि करारनाम्याच्या आणि मंजूरी पत्राच्या अटी, शर्ती आणि तरतूदींच्या संघर्षाच्या प्रसंगात, तर अशा प्रसंगात, करारनाम्याच्या अटी, शर्ती आणि तरतूदी अधिभावी होतील.

**5.11** कर्जदार मान्य करतो की हा करारनामा जेव्हा एफआयसीसीएलचा अधिकृत अधिकारी या करारनाम्यावर सही करेल त्या तारखेला आणि ठिकाणी पूर्ण होईल केला जाईल आणि बंधनकारक होईल.

या गोष्टीला साक्ष म्हणून यातील पक्षांनी ही सादरीकरणे या ठिकाणी आधी वर लिहीलेल्या दिवशी, महिन्यात आणि वर्षी निष्पादित केली आहेत निष्पादित करण्यास कारण झाले आहेत.

| कर्जदारासाठी | | |
|---|---|---|
| कर्जदाराचे नावः<br>.............................................................<br>अधिकृत स्वाक्षरीकर्त्याचे नाव (मालकीच्या, भागीदारीतील आणि कंपन्यांसाठी)<br>............................................................. | | ☒<br>....................................<br>(संही) |
| सह–कर्जदाराचे नावः<br>.............................................................<br>अधिकृत स्वाक्षरीकर्त्याचे नाव (मालकीच्या, भागीदारीतील आणि कंपन्यांसाठी)<br>............................................................. | | ☒<br>....................................<br>(संही) |
| फुलेर्टोन इंडिया क्रेडीट कंपनी लिमिटेड करिता<br>अधिकृत स्वाक्षरीकर्त्याचे नावः<br>............................................................. | | ☒<br>....................................<br>(संही) |

# कर्ज करारनाम्याला
# लोन समरी शेड्यूल

हे लोन समरी शेड्यूल यात नाव दिलेल्या कर्जदार आणि फुलेर्टोन इंडिया क्रेडीट कंपनी लि. (''कर्ज करारनामा'') यांच्या दरम्यान निष्पादित करण्यात आलेल्या दिनांकित ______________________ कर्ज करारनाम्याचा अविभाज्य भाग आहे आणि ते करारनाम्याच्या संयोगाने वाचले जाईल.

## कर्ज सुविधेचे वर्णन

| अनु.क्र | तपशील | | विवरण |
|---|---|---|---|
| 1 | अर्ज संदर्भ क्र. /कर्ज खाते क्र. | : | |
| 2 | एफआयसीसीएल शाखा<br>कार्यालयाचा पत्ता | : | |
| 3 | कर्जदाराचे आणि<br>सह–कर्जदाराचे<br>नाव आणि पत्ता | :<br>: | नावः ______________________<br>पत्ताः ______________________ |
| | | :<br>: | नावः ______________________<br>पत्ताः ______________________ |
| 4 | कर्जाची रक्कम | : | आयएनआर ______________________/-<br>(रुपये______________________मात्र) |
| 5 | व्याजाचा दर | : | ____________% दर साल कमी होत जाणाऱ्या शिलकीच्या आधारे (स्थायी दर) |
| 6 | कर्जाची मुदत | : | __________ महिने |
| 7 | अतिरिक्त व्याज<br>(प्रदानातील कसूरीसाठी लागू) | : | थकित मुदलाच्या रकमांवर दर महा 0,75% (शून्य बिंदु पंचाहत्तर टक्के) च्या बाहेर नसणारी रक्कम. |
| 8 | डॉक्युमेंटेशन आकार/शुल्क | : | आयएनआर______________/– च्या वर नसलेली रक्कम ज्यात प्रीइएमआय व्याज/ मुद्रांक शुल्क समाविष्ट असेल. |
| 9 | कर आणि आकार | : | वर किंवा कर्ज करारनाम्यात इतरत्र दर्शविलेले सर्व आकार त्यावरील मर्यादेशिवायच्या सेवा कर आणि अधिभारासहित लागू असू शकतील त्याप्रमाणे सर्व कर आणि वैधानिक आकार वगळून असतील. |

☒

## परतफेडीची अनुसूची

| समानीकृत मासिक हप्त्यांची संख्या (इएमआय) | पहिल्या इएमआयच्या आरंभाची तारीख | शेवटचा इएमआय देय असल्याची तारीख |
|---|---|---|
| | | |
| हप्ता क्र. | प्रत्येक इएमआयची देय तारीख | इएमआयची रक्कम |
| पहिला ते ______________ हप्ता | | आयएनआर______________________/- ☒ |
| __________ ते __________ हप्ता | | आयएनआर______________________/- |
| लवादाची आणि अधिकारितेचे स्थान | | |

| कर्जदारा(रां) साठी | |
|---|---|
| कर्जदाराचे नावः<br>..............................................................<br>अधिकृत स्वाक्षरीकर्त्याचे नाव (मालकीच्या, भागीदारी आणि कंपन्यांसाठी)<br>.................................................................. | ☒<br>..........................................<br>(संही) |
| सह–कर्जदाराचे नावः<br>..............................................................<br>अधिकृत स्वाक्षरीकर्त्याचे नाव (मालकीच्या, भागादारी आणि कंपन्यांसाठी)<br>.................................................................. | ☒<br>..........................................<br>(संही) |
| फुलेर्टोन इंडिया क्रेडीट कंपनी लिमिटेड करिता<br>स्वाक्षरीकर्त्याचे नावः<br>.................................................................. | ☒<br>..........................................<br>(संही) |

# आकार पत्रक

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | धनादेश/रोख रकमेचे संकलन (प्रति संकलन) | : | आयएनआर 300/– च्या बाहेर नसणारी रक्कम |
| 2 | पोस्ट–डेटेड धनादेशांच्या जागी इसीएस बदली करण्यासाठी स्वॅप आकार (प्रति प्रसंग) | : | आयएनआर 500/– च्या बाहेर नसणारी रक्कम |
| 3 | इसीएससाठी बँक बदलण्याचे स्वॅप आकार (प्रति प्रसंग) | : | आयएनआर 500/– च्या बाहेर नसणारी रक्कम |
| 4 | कर्ज रद्द करण्याचा आकार (पहिल्या इएमआयपूर्वी रद्द केलेले कर्ज) | : | आयएनआर 1000/– च्या बाहेर नसणारी रक्कम |
| 5 | धनादेश/इसीएस न वटण्यासाठी आकार (प्रत्येक न वटलेल्या धनादेशासाठी/ सादर केलेल्या प्रत्येक इसीएससाठी) | : | आयएनआर 30/– च्या बाहेर नसणारी रक्कम |
| 6 | मुदतपूर्व परतफेड आकार | : | (a) कर्जाच्या अंशतः मुदतपूर्व परतफेडीला परवानगी नसेल.<br>(b) थकित व्याजासह संपूर्ण कर्जाच्या मुदतपूर्व परतफेडीच्या बाबतीतः<br>• करारनाम्याच्या तारखेपासून 0 ते 17 महिनेः : मुदतपूर्व परतफेडीच्या तारखेला कर्जाच्या मुदलाच्या रकमेच्या 7%;<br>• करारनाम्याच्या तारखेपासून 18 ते 23 महिनेः : मुदतपूर्व परतफेडीच्या तारखेला कर्जाच्या मुदलाच्या रकमेच्या 5%;<br>• करारनाम्याच्या तारखेपासून 24 ते 35 महिनेः : मुदतपूर्व परतफेडीच्या तारखेला कर्जाच्या मुदलाच्या रकमेच्या 3%;<br>किंवा एफआयसीसीएलद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्टीत केली जाऊ शकेल अशी अन्य रक्कम.<br>(c) करारनाम्याच्या तारखेपासून 36 महिन्यांनंतर मुदतपूर्व परतफेडीच्या बाबतीत कोणतेही मुदतपूर्व परतफेड आकार लागू असणार नाहीत. |
| 7 | परताव्यासाठी प्रक्रिया शुल्क | : | आयएनआर 250/– च्या बाहेर नसणारी रक्कम |

ग्राहकाचे नावः
.................................................................. ........................................ ☒
(संही)

कर्जदार आणि सह–कर्जदाराने सही करायची आहे

# डिमान्ड प्रॉमिसरी नोट

तारीखः ____________________

ठिकाणः ____________________

मागणी केल्यावर मी/आम्ही ..........................................................................................................................................................

...................................... मेघ टॉवर्स, 3 रा मजला, जुना क्र. 307, नवीन क्र. 165, पूनामल्ली हाय रोड, मदुरायोवल, चेन्नई – 600095, तामील नाडू येथे जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे अशा फुलेर्टोन इंडिया क्रेडीट कंपनी लिमिटेडला (''एफआयसीसीएल'') प्राप्त झालेल्या मूल्यासाठी मासिक अंतराने हिशोब केलेल्या दरसाल ..................% च्या दराने व्याजासहित ☒

आयएनआर ............................../– (रुपये.........................................................................मात्र) संयुक्तपणे किंवा पृथकपणे आणि बिनशर्त प्रदान करण्याचे किंवा आदेश देण्याचे वचन देतो. प्रदानासाठी प्रेझेंटमेंट, नोटिंग आणि प्रोटेस्ट ऑफ दि नोट याद्वारे बिनशर्त आणि मागे न घेता येण्यायोग्य सोडून देण्यात आली आहे.

जिथे एकापेक्षा अधिक स्वाक्षरीकर्ते आहेत प्रत्येक स्वाक्षरीकर्त्याचे दायित्व संयुक्त आणि पृथक आहे.

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव ____________________ | येथे रु. 1/– चा रेव्हेन्यू स्टँप चिकटवा (X) कर्जदार |
| सह–कर्जदाराचे नाव ____________________ | येथे रु. 1/– चा रेव्हेन्यू स्टँप चिकटवा (X) सह–कर्जदार |
| सह–कर्जदाराचे नाव ____________________ | येथे रु. 1/– चा रेव्हेन्यू स्टँप चिकटवा (X) सह–कर्जदार |
| सह–कर्जदाराचे नाव ____________________ | येथे रु. 1/– चा रेव्हेन्यू स्टँप चिकटवा (X) सह–कर्जदार |

(नोट–(X) स्वाक्षरी रेव्हेन्यू स्टँपच्या संपूर्ण रुंदीवर करण्यात यावी)

# कर्जाच्या रकमेच्या वाटपासाठी सूचना

तारीखः

प्रति
फुलेर्टोन इंडिया क्रेडीट कंपनी लिमिटेड
..............................................
..............................................
..............................................
..............................................
विषयः वाटपासाठी अधिकार

**महोदय,**

.................................................. साठी कर्ज सुविधेच्या मंजूरीसाठी अर्जाचा संदर्भ घ्यावा. कृपया कर्ज वाटपाचा धनादेश यानंतर पुढे दिसणाऱ्या नावे आणि पद्धतीने तयार करण्यात यावा.

| आदात्याचे नाव | रक्कम (आयएनआर) |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

☒

उक्त आदात्याच्या नावे कर्जाचे वाटप कर्जाच्या सुविधेच्या संबंधातील माझ्याआमच्या कर्तव्यावर परिणाम करणार नाही.
उक्त आदात्याच्या नावे कर्जाचे वाटप कर्ज मलाआम्हाला मंजूर केल्याचे आणि मीआम्ही घेतल्याचे मानण्यात येईल.
आपल्याला धन्यवाद.

कर्जदाराचे नावः ............................................................................ ........................................ (स्वाक्षरी) ☒

अधिकृत स्वाक्षरीकर्त्याचे नाव (मालकीच्या, भागीदारी आणि कंपन्यांसाठी)

..................................................................................................................

सह–कर्जदाराचे नावः ........................................................................... ........................................ (स्वाक्षरी) ☒

अधिकृत स्वाक्षरीकर्त्याचे नाव (मालकीच्या, भागीदारी आणि कंपन्यांसाठी)

..................................................................................................................

पुष्टीकरण

मीआम्ही मलाआम्हाला कर्जाच्या रकमेच्या वाटपाप्रती पुढील वर्णनाचे धनादेश मिळाल्याची पोचपावती देतो.

| धनादेश क्र. | रक्कम | तारीख | बँकेचे नाव | च्या नावे |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

☒

आपल्याला धन्यवाद

कर्जदाराचे नावः ............................................................................ ........................................ (स्वाक्षरी) ☒

अधिकृत स्वाक्षरीकर्त्याचे नाव (मालकीच्या, भागीदारी आणि कंपन्यांसाठी)

..................................................................................................................

सह–कर्जदाराचे नावः ........................................................................... ........................................ (स्वाक्षरी) ☒

अधिकृत स्वाक्षरीकर्त्याचे नाव (मालकीच्या, भागीदारी आणि कंपन्यांसाठी)

..................................................................................................................

# नॅशनल इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफरद्वारे कर्जाच्या वाटपासाठी अर्ज प्रपत्र

तारीखः [ ]

प्रति,
फुलेर्टोन इंडिया क्रेडीट कंपनी लिमिटेड
______________________________
______________________________
______________________________

विषयःनॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर योजनेमार्फत इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफरद्वारे कर्जाचे वाटप

संदर्भः कर्जासाठी अर्ज संदर्भ क्र. :[ ]
कर्ज खाते क्रमांक :[ ]

**माननीय महोदय,**

माझ्याआमच्या कर्जासाठी अर्जाच्या संदर्भात, मी/आम्ही मंजूर केलेली कर्जाची रक्कम आयएनआर__________________– (रुपये_____________________________________________मात्र) (डॉक्युमेटेशन आकार आणि प्रक्रिया शुल्काच्या कपातीनंतर) पुढील तपशीलाप्रमाणे थेट वित्तप्रेषण करण्याची बिनशर्त सूचना फुलेर्टोन इंडिया क्रेडीट कंपनी लि. (एफआयसीसीएल) ला देतोः–

लाभार्थीचा तपशील

| | | |
|---|---|---|
| लाभार्थीच्या बँकेचे नाव | : | |
| लाभार्थीच्या बँक खात्याचे नाव | : | |
| लाभार्थीचे बँक खाते # | : | |
| लाभार्थीच्या खात्याचा प्रकार | : | ☐ बचत ☐ चालू ☐ कॅश क्रेडीट |
| लाभार्थीचे बँक पेयेबल ठिकाण | : | |
| लाभार्थीच्या बँक शाखेचा आयएफएससी कोड | : | |
| एमआयसीआर कोड | : | |
| वित्तप्रेषित करावयाची रक्कम | : | |

☒

मीआम्ही घोषित करतो कीः

- दिलेला तपशील माझ्याआमच्या उत्तम माहितीप्रमाणे सत्य, बरोबर आणि संपूर्ण आहे. प्रदानाच्या सूच नेत दिलेल्या तपशीलाच्या अचूकतेसाठी मीआम्ही जबाबदार असू.
- फुलेर्टोन इंडियाने सद्भावनेने आणि इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफरसाठी सूचनांच्या अनुपालनात प्रदानाच्या सूचनेची अंमलबजावणी केली असेल तर, मी/आम्ही फिलेर्टोन इंडियाने अंमलबजावणी केलेल्या कोणत्याही प्रदानाच्या सूचनेला बांधील असू.
- उपरोक्त लाभार्थीच्या नावे केलेले कर्जाचे वाटप मलाआम्हाला मंजूर केलेले आणि मीआम्ही घेतलेले कर्ज मानले जाईल. उक्त लाभार्थीच्या नावे कर्जाचे वाटप कर्जाच्या सुविधेच्या संबंधातील माझ्याआमच्या कर्तव्यावर परिणाम करणार नाही.
- अपूर्ण माहिती, पारेषणातील दिरंगाई, इलेक्ट्रॉनिक मेसेजची पोच किंवा ना–पोच किंवा कोणतीही चूक, पारेषणातील किंवा त्याच्या संबंधातील डिलीवरी किंवा तिच्या नियंत्रबाहेरील प्रसंग यांचा परिणाम म्हणून किंवा त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही तोट्यासाठी किंवा नुकसानासाठी फुलेर्टोन इंडिया जबाबदार असणार नाही. वरील विचारात न घेता, फंड ट्रान्सफरच्या पूर्ततेतील कोणत्याही दिरंगाईच्या किंवा फुलेर्टोन इंडियाच्या बाजूने कोणत्याही दुर्लक्षामुळे प्रदानाच्या सूचनेच्या अनुषंगाने फंडस् ट्रान्सफरच्या अंमलबजावणीतील कोणत्याही चुकीमुळे ताट्याच्या प्रसंगात, फुलेर्टोन इंडियाचे दायित्व प्रदानातील दिरंगाईच्या बाबतीत दिरंगाईच्या कालावधीसाठी बँक दराने व्याजाच्या प्रदानापर्यंत मर्यादित असेल.
- या अर्ज प्रपत्रात माझ्याकडूनआमच्याकडून चुकीची माहिती दिल्यामुळे वित्तप्रेषित रक्कम जमा न होणे किंवा चुकीच्या लाभार्थीच्या नावे जमा होणे यासाठी फुलेर्टोन इंडिया जबाबदार असणार नाही.
- लाभार्थी बँक आवक वित्तप्रेषणासाठी आकार लावू शकेल आणि ते वित्तप्रेषित रकमेतून कापून घेऊ शकेल.

मीआम्ही समजतो की नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर (''एनइएफटी'') सूचना मागे घेता येत नाहीत आणि एनइएफटी मार्फत वित्तप्रेषणाच्या संबंधात स्टॉप पेमेंट सूचना देण्याची कोणतीही सुविधा नाही.

आपल्याला धन्यवाद

आपले विश्वासू

| कर्जदाराचे आणि सह–कर्जदाराचे नाव | | (सही) |
|---|---|---|
| नावः ............................................................................................................ | | ............................................ ☒<br>(सही) |
| नावः ............................................................................................................ | | ............................................ ☒<br>(सही) |

# सर्वात महत्त्वाच्या अटी आणि शर्ती

## कृपया सही करण्यापूर्वी काळजीपूर्वक वाचा

## पोचपावती प्रपत्र

तारीखः [ ]

मीआम्ही फुलेर्टोन इंडिया क्रेडीट कंपनीच्या (एफआयसीसीएल) नावे मीआम्ही निष्पादित केलेल्या दिनांकित ................................ अर्ज संदर्भ क्र. ..................... चा संदर्भ देतो. मलाआम्हाला खालील माहिती देण्यात आली आहे आणि मीआम्ही त्याच्याशी सहमत आहोत आणि त्यानुसार मीआम्ही पूर्वोक्त करारनामा भरला आहेः

| | | |
|---|---|---|
| कर्जाची रक्कम | : | आयएनआर |
| कमी होत जाणाऱ्या शिलकीवर व्याजाचा दर (% दरसाल) | : | |
| तदनुरुप सरसकट व्याजाचा दर (% दरसाल)* | : | |
| कर्जाची मुदत महिन्यांमध्ये | : | |
| मासिक हप्त्याची रक्कम (इएमआय) | : | आयएनआर |
| एकूण शुल्के (कर्ज कागदपत्रांचे शुल्क, प्री–इएमआय, काही असल्यास त्यासहित) | : | आयएनआर |
| इन्शुरन्स प्रिमियम आकार | : | आयएनआर |
| आयएचओ आकार | : | आयएनआर |

☒

*मला/आम्हाला जाणीव आहे की वर नमूद केलेल्या सरसकट व्याजाचा दर केवळ निदर्शी आहे आणि की कर्जावर व्याज कमी होत जाणाऱ्या शिलकीवर तत्त्वावर मासिक अंतराने चक्रवाढीने आकारले जाईल.

सरसकट व्याजाचे गणन पुढीलप्रमाणे केले आहेः

$$\text{व्याजाचा दर \%} = \frac{(\text{इएमआय x मुदत महिन्यात})\text{-मुद्दल X 100}}{\text{मुद्दल x वर्षांमध्ये मुदत}}$$

मी/आम्ही पोच देतो कीः

- वरील अटी पूर्वोक्त कर्जाच्या वरील सर्वात महत्त्वाच्या अटी आहेत, आणि कर्जाच्या इतर सर्व अटी आणि शर्ती कर्ज करारनाम्यात विनिर्दिष्टीत केल्या जातील.
- मला/आम्हाला या वस्तुस्थितीची जाणीव आहे की एफआयसीसीएलला कोणताही आकाराच्या भाराची आणि/किंवा भारातील बदलाची किंवा असा भार सुरू करण्याची माहिती आगाऊ किंवा नंतर देणे बंधनकारक नाही.
- एफआयसीसीएल कोणत्याही सूचनेशिवाय कसूरीच्या प्रसंगात कोणतीही सुविधा वाढविण्यास, काढून टाकण्यास, मागे घेण्यास किंवा पूर्वोक्त अटी आणि शर्तीमध्ये बदल करण्यास पात्र आहे आणि ते माझ्यावर/आमच्यावर बंधनकारक असेल.
- पत्रव्यवहारासाठी पत्त्यातील कोणत्याही बदलाच्या, माझ्या/आमच्या नोकरीतील, व्यवसायातील बदलाच्या प्रसंगात माझ्याकडून/आमच्याकडून त्याची माहिती एफआयसीसीएलला एक महिना आगाऊ कळवली जाईल.

कर्जदारा(रां)चे(ची) नाव(नावे)ः .......................................... ☒

सही(सह्या)ः ............................................................... ☒

- कृपया वरील डॉक्युमेंट कोरे असल्यास सही करू नका.
- कृपया तुमच्या कर्जाच्या प्रक्रियेसाठी कोणालाही पैसे देऊ नका. जर तुमच्याकडे मागण्यात आले तर, कृपया नकार द्या आणि तुमच्या नजीकच्या एफआयसीसीएल शाखेशी संपर्क साधा.